अभियोग पक्षातर्फे **साक्षीदार क्र. ०५** चा सरतपास

मी शपथेवर कथन करतो की,

नाव – बसवराज व्यंकप्पा सुगुर,

वय – ३८ वर्षे, हुद्दा – शाखाधिकारी,

नेमणूक – बँक ऑफ बडौदा, शाखा कुडाळ, जि. सिंधुदुर्ग.

<u>सरतपास अभियोग पक्षातर्फे सहायक सरकारी अभियोक्ता श्री. जी. आर. माजगावकर</u>

**१.** मी सन २०२४ पासून बँक ऑफ बडौदा, शाखा कुडाळ येथे शाखाधिकारी म्हणून कार्यरत आहे.

**२.** मौजे ओरोस फाटा, प्लॉट क्र. २४ सर्वे क्र. २७९ हिस्सा क्र. ३९ ही प्रॉपर्टी आमच्या बँकेकडे गौरीशंकर राऊत याने तारण ठेवली होती. त्यांनी त्या मालमत्तेवर रक्कम रु.१३,००,०००/– इतके कर्ज घेतले होते. त्यावेळी आरोपीने मूळ खरेदीखत दिले होते. आरोपीने सदर मिळकतीचे दिनांक १३/०१/२०२३ रोजी इक्विटेबल मॉर्गेज करुन दिले होते. सन २०२४ मध्ये आरोपीने कर्ज हप्त्याची व कर्जाची परत फेड केली नाही त्यामुळे आरोपी हा बँकेचा थकबाकीदार झाला. त्यामुळे बँकेने सरफेसी ॲक्ट नूसार आरोपी विरुध्द कारवाई करुन सदर मिळकतीचा कब्जा बँकेकडे घेतला. सध्या बँक सदर मिळकतीच्या लिलाव करण्याच्या प्रक्रियेत आहे. मिळकतीचा कब्जा घेतल्यानंतर आम्हाला पोलीसांकडून माहिती मिळाली की, आरोपीने सदरची मिळकत त्रयस्थ इसमास विकली आहे व त्यासंदर्भात फौजदारी तक्रार झालेली आहे. त्याबाबत पोलीसांनी माझ्याकडे चौकशी केली.

<u>साक्षीदाराने मूळ कागदपत्र सोबत आणली नसल्याने सरतपास तहकूब.</u>

श्रवणोत्तर स्वीकृत,

सही/–

(श्रीमती स्वाती जं. पाटील)

दिनांकः ०६/०८/२०२६

अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी,

सिंधुदुर्ग – ओरोस.

अभियोग पक्षातर्फे **साक्षीदार क्र. ०५** चा उर्वरीत सरतपास सहायक सरकारी अभियोक्ता श्री. जी. आर. माजगावकर

३. मी पोलीसांना आरोपीचे कर्ज मंजूरी पत्र, गौरीशंकर राऊत यांची खरेदीखताची सही शिक्क्याची नक्कल, तारण कागदपत्र, सरफेसी कायद्यानूसार केलेल्या कारवाईबाबतचे कागदपत्र यांच्या स्वसाक्षांकित नक्कला पोलीसांना दिल्या होत्या. सदरचे मूळ कागदपत्र मी आज रोजी सोबत आणलेले आहेत. मला आता कर्ज मंजूरी पत्राची स्वाक्षांकित प्रत दाखवली. ती तिच असून मूळ प्रमाणे बरोबर आहे. त्यावर स्वसाक्षांकित म्हणून माझी सही आहे. सबब, त्यास **निशाणी क्र. ५१** देण्यात येत आहे.

४. मला आता गौरीशंकर राऊत यांच्या खरेदीखताची प्रत दाखवली. त्याची मूळ मी आज रोजी सोबत आणलेली आहे. ती तिच असून मूळ प्रमाणे बरोबर आहे. सदरचे खरेदीखत हे दिनांक ०१/०९/२०२२ रोजी नोंदणीकृत झालेले होते व त्याचा नोंदणी क्र. २१७४/२०२२ असा आहे. त्यावर स्वसाक्षांकित म्हणून माझी सही आहे. मूळ दस्त व न्यायालयात दाखल केलेल्या दस्तातील मजकूर एकच आहे. सबब, त्यास **निशाणी क्र. ५२** देण्यात येत आहे. गौरीशंकर राऊत यांनी सदरचे खरेदीखत सुरेश नारायण चव्हाण प्लॉट क्र. २४, स.क्र.२७९/३९, गाव मौजे ओरोस बुद्रुक येथील आहे. त्यावर गौरीशंकर राऊत व सुरेश चव्हाण यांची सही व अंगठा आहे.

५. मला आता equitable mortgage दस्ताचा इंडेक्स २ दाखविण्यात आला. त्यासोबत तारणाबाबत नोटीस ऑफ इंटिमेशन जोडण्यात आलेले आहे. सदरचा दस्त स्वक्षांकित करण्यात आलेला आहे. त्यावर स्वसाक्षांकित म्हणून माझी सही आहे. त्यातील मजकूर हा मूळ दस्ताप्रमाणे बरोबर आहे. सदरचा दस्त दिनांक १३/०१/२०२३ रोजी करण्यात आलेला आहे. सबब, त्यास एकत्रात **निशाणी क्र. ५३** देण्यात येत आहे.

६. गौरीशंकर राऊत याने कर्जाची रक्कम परतफेड करण्याचा असमर्थ झाला व बॅंकेचा थकबाकीदार झाला. त्यानूसार बॅंकेने सरफेसी कायद्यानूसार कारवाई केली व न्यायालयाच्या आदेशाने तारण ठेवलेल्या मिळकतीचा कब्जा घेतला व बॅंके तर्फे लिलावाची प्रक्रिया सुरु करण्यात येत आहे. मी आरोपीस ओळखू शकतो. आरोपी आज रोजी न्यायालयात गैरहजर आहे.

सरतपास पूर्ण.

आरोपीच्या वकीलांनी आरोपीच्या गैरहजेरीत काम चालविण्याबाबत निशाणी क्र. ५० कडे अर्ज दिलेला आहे.

उलटतपास आरोपी तर्फे वकील श्रीमती श्वेता तेंडुलकर यांचेमार्फत

७. आरोपीची कर्ज मंजूरी ही माझे पूर्वशाखाधिकारी यांचे समक्ष झालेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, मिळकतीच्या मूल्यांकनापेक्षा कमी कर्ज दिले जाते. साक्षीदार सांगतो की, इतर बाबी विचारात घेता मिळकतीच्या मूल्यांकनाइतके देखील कर्ज दिले जावू शकते. हे म्हणणे खरे आहे की, स्थावर मिळकत ही Collateral Security (तारण हमी) म्हणून तारण दिलेली असून त्याचे मूल्यांकन रु.७,५०,०००/– इतके आहे. हे म्हणणे खरे आहे की, रक्कम रु.१३,००,०००/– चे लोन हे केवळ स्थावर मिळकतीच्या तारणावर दिलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, तारण दिल्यानंतर त्याबाबतची नोंद नोंदणी कार्यालयाकडे दिली जाते. हे म्हणणे खरे आहे की, पोलीसांनी माझा जबाब नोंदवलेला नाही.

८. हे म्हणणे खरे नाही की, मी माझ्या वरील सरतपासात सांगितलेला मजकूर खोटा कथन केलेला आहे.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत,

सही/–

(श्रीमती स्वाती जं. पाटील)

दिनांकः १२/०८/२०२६

अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी,

सिंधुदुर्ग – ओरोस.